# प्रेस नोट

## आठ वर्षे फरारी असलेला व वैभववाडी,विजयदुर्ग पोलीस स्टेशनला पाहीजे असलेल्या गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखा, सिंधुदुर्ग यांचेकडून शिताफिने जेरबंद

---

मा. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम, मा. अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री प्रकाश गायकवाड यांनी पाहीजे फरारी आरोपी अटक करणेकामी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग चे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांना विशेष सुचना दिलेल्या होत्या. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग चे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांनी सदर आरोपीत यांची माहीती काढून अटक करणेकामी स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस उप निरीक्षक श्री शाहू देसाई यांचे नेतृत्वाखाली खास पोलीस पथक तयार करण्यात आलेले होते.

**सन २०१० मध्ये विजयदुर्ग येथील श्री रामेश्वर मंदीरातील जबरी चोरी प्रकरणातील** ( मा. जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग यांचे न्यायालयातील सेशन केस नंबर ३६/२०१०) या केस मधील आरोपीत हा गेली आठ वर्षे फरारी होता. त्यामुळे सदर केस ही मा न्यायालयात प्रलंबित होती. सदर पोलीस पथकाने सदर फरारी आरोपीचे ठावठिकाणाबाबत माहीती काढून तसेच आरोपीत राहत असले ठिकाणी नाशिक या ठिकाणी जावुन त्याची गोपनीय माहीती काढण्यात आलेली होती. आज दि. १२.०७.२०१८ रोजी सदर गुन्हयातील फरारी आरोपीत हा सिंधुदुर्ग रेल्वे स्टेशन येथे येत असल्याची माहीती प्राप्त झाले वरुन सिंधुदुर्ग रेल्वे स्टेशन येथे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग चे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस उप निरीक्षक श्री शाहू देसाई यांनी पोलीस स्टाफसह सापळा रचुन आरोपीत हा सिंधुदुर्ग रेल्वे स्टेशन येथे येताच त्यास शिताफिने जेरबंद केले. व त्यास मा. जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग येथे पुढील कार्यवाहीकरीता हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम, मा. अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री प्रकाश गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग चे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील, पोलीस उप निरीक्षक श्री शाहू देसाई, सपोफौ/आंबेरकर, सपोफौ/खांदारे, पोहवा/आशिष गंगावणे, कोयंडे, पोना/खंडे, पोकॉ/पाटील, पोकॉ/इंगळे, पोकॉ/खाडये, पोकॉ/कांदळगांवकर, महीला पोकॉ/ भक्ती सावंत, दिव्यांका राणे, स्वाती सावंत, शितल नांदोस्कर यांनी केलेली आहे.

---

पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग